लोकमत

# पोलीस शिपाई चालक भरती २०२२-२०२३

महाराष्ट्रसहाय्यक पोलीस उपनिरीक्षक चालक,पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम, २०१९ व त्यानंतर शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारणा आणि दिनांक २७/०६/२०२२, दिनांक २३/०९/२०२२ व दिनांक २३/०९/२०२२ अन्वये सेवाप्रवेशात नियमात केलेल्या सुधारिततरतुदीनुसार पोलीस दलातील पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई चालक यांची ३९ रिक्त असलेली पदे भरण्यासाठी देखील आवेदनपत्र संगणकीय प्रणालीव्दारे दिनांक ०५/०३/२०२४ ते ३१/०३/२०२४ या कालावधीत स्विकारण्यात येतील ह्या बाबत सविस्तर माहीती **policerecruitment2024.mahait.org** आणि **www.mahapolice.gov.in** या संकेतस्थळावर उमेदवारांच्या माहीतीकरीता प्रसिध्द करण्यात आली आहे.

●उमेदवारास पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई चालक या पदांसाठी ऑनलाईन आवेदन अर्ज सादरकरता येईल. ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादरकरण्याची सुविधा policerecruitment2024.mahait.org या संकेतस्थळावर उपलब्ध राहणार आहे. ●उमेदवार एका पदाकरीतासंपुर्ण महाराष्ट्र राज्यात फक्त एका घटकात अर्ज करु शकतो. ●उमेदवाराने चुकीची माहीती दिल्यास, उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल. ●पोलीस शिपाई चालक या पदासाठी अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची प्रथम ५० गुणाची शारीरीक चाचणी घेण्यात येईल. सदर शारीरीक चाचणीत किमान ५० टक्केगुण प्राप्त करणारे उमेदवार, संबंधित प्रवर्गातील जाहीरातीत नमुद केलेल्या रिक्त जागांच्या १:१० या प्रमाणात उमेदवार लेखी परीक्षेसाठी पात्र ठरतील. **●लेखी चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना,हलके मोटार वाहन चालविण्याची चाचणी २५ गुणांची व जीप प्रकारातील वाहन चालविण्याची चाचणी २५ गुणांची अशी एकुण ५० गुणांचीकौशल्य चाचणीद्यावी लागेल. सदर दोन्ही चाचण्यांमध्ये एकत्रित किमान ४० टक्केगुण मिळवुन उमेदवारांना उत्तीर्ण व्हावे लागेल. कौशल्य चाचणीही केवळ एक अर्हता चाचणी असुनकौशल्य चाचणीत मिळालेलेगुण, गुणवत्ता यादी तयार करण्यासाठी विचारात घ्यावयाच्या एकुणगुणात समाविष्ट केले जाणार नाहीत.कौशल्य चाचणीत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.** ● सर्व पोलीस घटकांमध्ये लेखी परिक्षा एकाच दिवशी आयोजित करण्यात येईल. त्यासाठी अर्जदाराने आवेदन अर्ज भरतेवेळी सदरची बाब विचारत घेऊनच आवेदन अर्ज भरावा. ●शारीरीक चाचणी व लेखी परीक्षामध्ये प्राप्त केलेल्या एकुणगुणांच्या आधारे उमेदवाराची गुणवत्तेनुसार तात्पुरती निवडसुची तयारकरण्यात येईल. तात्पुरत्या निवडसुचीमध्ये समावेश झालेल्या उमेदवारांचीच मुळकागदपत्रे पडताळणीकरण्यात येतील. कागदपत्रे पडताळणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निवडसुचीमध्ये समावेश केला जाईल. निवडसुचीतील उमेदवारांची निवड तात्पुरती (provisional selection)असेल. **शारीरीकचाचणी व लेखी चाचणी यामध्ये मिळालेल्या गुणांचे एकत्रिकरणकेल्यानंतर, गृहविभाग शासन निर्णय, दिनांक १०/१२/२०२० नुसार अंतीम गुणवत्तायादी तयारकरण्यांत येईल. ●पोलीस शिपाई चालक पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, शारिरीक पात्रता आवश्यक असलेली प्रमाणपत्रे/कागदपत्रे, सामाजिक व समांतर आरक्षणाबाबतची माहिती परिक्षा शुल्क, आवेदन अर्ज सादर करण्याबाबतची माहिती, अर्ज सादरकरण्याचा दिनांक व वेळ आणि उमेदयारांसाठी सविस्तर सुचना** policerecruitment2024.mahait.org या. संकेतस्थळावर दिलेल्या सविस्तर जाहिरातीमध्ये उपलब्ध आहेत. सदरहु जाहिरात उमेदवारांनी काळजीपूर्वक वाचून, समजून घ्यावी. तसेच, सामाजिक, समांतर आरक्षण व अनाथांकरीताउपलब्ध पदांच्या १% आरक्षीत जागा विचारात घेऊन रिक्त पदांबाबतची खातरजमा करावी व त्यानंतरच उमेदवारांनी ऑनलाईन पदध्दतीने आवेदन अर्ज सादर करावेत. **●भरती प्रक्रिये दरम्यान शारिरीक चाचणी व लेखी चाचणीमध्ये निश्चित केलेल्या दिनांकास उमेदवार गैरहजर राहिल्यास, त्यास भरती प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल. कार्यालयाने एकदा निश्चित केलेल्या दिनांकामध्येकोणत्याही परिस्थितीत बदल करण्यात येणार नाही.** ●उमेदवारांनी संकेतस्थळावर जावुन आवेदन अर्ज सादर करावयाचा आहे. त्या घटकात रिक्त असलेले पदे विचारात घेऊनच उमेदवारांनी अर्ज सादर करावेत, मागासवर्गीय उमेदवार खुल्या प्रवर्गात (unreserved) अर्ज करु शकतात. परंतुखुल्या प्रवर्गातील (unreserved) उमेदवार मागासवर्गीय प्रवर्गात अर्ज करु शकणार नाही. ● पदोन्नतीवरील आरक्षणासंदर्भात शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिकाक्रमांक २८३०६/२०१७ बाबत होणाऱ्या अंतीम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहुन व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहीत याचीकाक्रमांक १७५/२०१८ व इतरसंलग्न याचिकांमध्ये दिनांक २७/०६/२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेबाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन रिक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे जाहीरातीमध्ये नमुद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो व त्याची माहीती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यानुसार नियुक्ती अधिकारी यांना पदे भरण्याचा अधिकारी आहे.

सही

**(राकेश ओला)**

पोलीस अधीक्षक, अहमदनगर